प्रभात
पुणे मंगळवार, दि. १९ ऑक्टोबर २०१०


# शुभांगी मुळे यांच्या गायनाने पुणे नवरात्रोत्सवाची सांगता

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) : गेली १० दिवस श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे चालू असणाऱ्या पुणे नवरात्रोत्सवाची सांगता दसऱ्याच्या दिवशी जेष्ठ गायिका शुभांगी मुळे व सहकारी यांच्या गायनाने झाली.

यावेळी 'या रावजी बसा भावजी', 'बुगडी माझी सांडली ग', 'तुझ्या उसाला लागंल कोल्हा', 'वाजले की बारा', पोवाडा-'मी शिवाजीराजे भोसले', 'मन उधान वाऱ्याचे' आदी गाण्यांच्या तालावर उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. महोत्सवाचे आयोजक नगरसेवक आबा बागुल यांनी उपस्थित कलावंताचा सत्कार केला तसेच गेली १६ वर्षे सातत्याने सुरू असणाऱ्या पुणे नवरात्रोत्सवाला पुणेकरांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल सर्वांचे आभार मानले.